## इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

## राज्यशास्त्र विभाग

## शैक्षणिक अभ्यास सहल अहवाल - २०१९-२०

राज्यशास्त्र विभागामार्फत विधिमंडळाचे अर्थ संकल्पीय अधिवेशन कामकाज पाहणी करण्यासाठी 3 मार्च 2020रोजी एकदिवसीय शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीसाठी 39 विद्यार्थी व 05 प्राध्यापक सहभागी झाले होते. वर्गामध्ये आपण विधिमंडळाच्या कामकाजाविषयी सैद्धांतिक बाजू शिकवत असतो पण प्रत्यक्ष कामकाज कसे चालते ते पाहण्यासाठी व त्याचा अनुभव घेण्यासाठी अशा शैक्षणिक सहलीची आवश्यकता असते. विधानसभा अधिवेशन कामकाज १ तास व विधानपरिषद कामकाज १ तास असा कालावधी आम्हाला मिळाला. त्या कालावधीमध्ये विधानपरिषद मा. सभापती नीलमताई गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सभागृहात अन्नसुरक्षा विधेयाकावर चर्चा सुरु होती, अन्न व औषधे यांची भेसळ कशी रोखायची , त्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे या संदर्भात सन्माननिय सदस्य जयंत पाटील, सुरेश धस,दिवाकर रावते, भाई जगताप यांनी मते व सूचना मांडल्या.

विधानसभा सभागृहामध्ये विधानसभेचे अध्यक्ष मा. नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय शिक्षण,सांस्कृतिक कार्य मंत्री मा.अमित देशमुख यांनी परिचारिका सुधार विधेयक मांडले. त्यावर सभागृहाचे विरोधी पक्षनेते मा. देवेंद्रजी फडणवीस, बबनराव पाचपुते, भास्कर जाधव या सन्माननिय सदस्यांनी सूचना केल्या व हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर झाले.सैद्धांतिक ज्ञानाला अनुभावाची जोड मिळाल्यामुळे शिकणे सुकर व प्रभावी होते याची प्रचिती आम्हाला आली.

अशी शैक्षणिक सहल काढण्यासाठी परवानगी संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी पाटील साहेब,उपाध्यक्षा मा.पद्माताई भोसले,सचिव मा.मुकुंद्शेठ शहा,मा. प्राचार्य डॉ.संजय चाकणे सर यांनी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल राज्यशास्त्र विभाग आपला आभारी आहे.




डॉ. दिगंबर बिरादार